01C

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# Maharashtra Electricity Regulatory Commission

MERC/ADM/RTI/048/2021/ **0449** Dt. 30.09.2021

**प्रति,**
श्री. राजीव मा. आंबीकर,
अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०००३२.

विषय :- श्री शैलेश भागनाथ ससाणे यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 6 (3) अन्वये हस्तांतरित केलेल्या अर्जाबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. माअअ-2021/प्र.क्र.185/ऊर्जा-2, दि.27.09.2021

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्रास अनुसरून, आपण दि. २९.०९.२०२१ रोजी पाठविलेल्या ईमेला अनुसार श्री शैलेश भागनाथ ससाणे यांचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 6 (3) अन्वये या कार्यालयास दि. 29.09.2021 रोजीच्या ईमेलद्वारे हस्तांतरित केलेला आहे. सदर अर्जानुसार श्री. ससाणे यांनी मागितलेली माहिती ही आयोगाच्या कार्यालयाशी संबंधित नसून सदर माहिती ही ऊर्जा विभागाच्या कार्यालयाशी संबंधीत आहे.

तसेच आपणांस असेही कळविण्यात येते की, अर्जदाराने माहितीच्या अधिकाराच्या अर्जात ऊर्जा विभागाच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयाची माहिती मागितलेचा उल्लेख त्यांनी त्यांच्या अर्जात कुठेच नमूद केलेला नाही, असे सकृत दर्शनी स्पष्ट दिसून येते. त्यानुसार आपणांस विनंती आहे की, माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपल्या कार्यालयास प्राप्त झालेले माहीती अधिकारबाबतचे अर्ज प्रथमत: व्यवस्थितरित्या तपासून अथवा पडताळणी करूनच सदर माहितीचा अधिकार अर्ज माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 6(3) अन्वये इतर विभागाकडे वर्ग करावेत.

वरील बाबींचा विचार करता श्री. शैलेश ससाणे यांचा माहितीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 6(3) अन्वये या कार्यालयाकडून फेटाळण्यात येत आहे, याची कृपया आपण नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

प्रदिप मोहरे

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

**प्रत:** श्री. शैलेश भागनाथ ससाणे,
उभा मारुती मंदिर,
जि. कोल्हापूर - ४१६०१२.
Email ID: Shaileshsasane89@gmail.com